# *अध्याय बारावा प्रारंभ*



॥ श्री गणेशाय नमः ॥
हे गणाधीशा गणपती । मयुरेश्वरा विमलकीर्ति ।
माझ्या हृदयीं करुन वस्ती । ग्रंथ कळसास नेई हा ॥१॥

तूं ज्ञानबुध्दीचा दाता । तूं भक्तमनोरथ पुरविता ।
विघ्ननगातें संहारिता । तूंच एक गणराया ॥२॥

तूं साक्षात् चिंतामणी । चिंतिलेलें देशी जाणीं ।
आपुल्या भक्तांलागूनी । ऐसें पुराणे म्हणतात ॥३॥

माझ्या मनीची अवघी चिंता । लयास नेई एकदंता ।
लंबोदरा पार्वतीसुता । भालचंद्रा सिंदुरारे ॥४॥

असो बच्चुलाल अग्रवाला। होता एक आकोल्याला।
धन-कनक-संपन्न भला। मनाचाही उदार जो ॥५॥

त्यानें हकिकत कारंज्याची। म्हणजे लक्ष्मणपंत घुडयाची।
कर्णोपकर्णी ऐकली साची। तेणें साशंक जाहला ॥६॥

तें खरें खोटें पहाण्यास। विचार करी चित्तास।
तों एके समयास। महाराज आले अकोल्याला ॥७॥

येऊन बच्चुलाला घरीं। बैसते झाले ओटयावरी।
कीं गजानन साक्षात्कारीं। भक्त आपुला जाणून ॥८॥

बच्चुलाला आनंद झाला। तो समर्थांसी ऐसे वदला।
आज गुरुराया वाटतें मला। आपली पूजा करावी ॥९॥

ऐसें ऐकतां भाषण। समर्थे तुकविलीं मान।
जें साक्षात् असे चिन्ह। श्रोते संमती दिल्याचें ॥१०॥

बच्चुलालानें तयारी। तात्काळ केली ओटयावरी।
षोडशोपचारे अत्यादरीं। पूजन त्यानें आरंभिले ॥११॥

प्रथमतः घातले मंगलस्नान। नानाविध उटणीं लावून।
मग करविलें परिधान। वस्त्र पीतांबर जरीचा ॥१२॥

शालजोडी अंगावरीं। बहुमोल घातली काश्मिरी।
एक जरीचा रुमाल शिरीं। अभ्रेस्मी आणूनि बांधिला ॥१३॥

गोफ घातिला गळ्यांत। सलकडी ती हातांत।
करांच्या दाही बोटांत। मुद्रिका घातल्या नानापरी ॥१४॥

बहुमोल हिऱ्याची। वामकरी घातली पौची।
रत्नजडीत कंठयाची। कंठीं शोभा विशेष ॥१५॥

जिलेबी राघवदास पेढे। नैवेद्यास ठेविलें पुढें।
त्रयोदश गुणी ठेविलें विडे। एक्या लहान तबकांत ॥१६॥

अष्टगंध अर्गजा अत्तर। सुवासिक लाविलें फार।
त्यानें अवघ्या अंगभर। गुलाबपाणी शिंपडीलें ॥१७॥

एका सुवर्णाच्या ताटी। दक्षिणा ठेविली शेवटीं।
ती होतीं फार मोठी। रुपये होन मोहोरांची ॥१८॥

बेरीज करता दहा हजार। येईल ती साचार।
ऐशी दक्षिणा होती थोर। किती वर्णन करूं तिचें ॥१९॥

श्रीफळ पुढें ठेवून। विनये केलें भाषण।
महाराज माझें इच्छी मन। राममंदिर बांधावया ॥२०॥

या माझ्या ओटयावरी। अडचण होतसे भारी।
मंडप तो घातला जरी। उत्सवासी गुरुराया॥२१॥

त्या माझ्या मनोरथा। पूर्ण करी ज्ञानवंता।
ऐसे म्हणून ठेविला माथा। अनन्यभावें पायावरी॥२२॥

त्यावरी साधु गजानन। देते झाले आशीर्वचन।
श्रीजानकीजीवन। तुझा करील पूर्ण हेतू॥२३॥

असो, आज तूं हे काय केलें ?। मला पोळयाचा बैल बनविलें।
हे अलंकार घालून भलें। त्याचें काय कारण ?॥२४॥

मी न बैल पोळयाचा। अथवा घोडा दसऱ्याचा।
मला या दागदागिन्यांचा। काय सांग उपयोग ?॥२५॥

अरे हें अवघे विष। मला नको त्यांचा स्पर्श।
या नसत्या उपाधीस। माझ्या मागे लावू नको॥२६॥

अथवा तूं मोठा श्रीमान। हे दाखवाया कारण।
केलेंस कां हें प्रदर्शन। सांग मसी बच्चुलाला ?॥२७॥

जे आवडते जयासी। तेंच द्यावें तयासी।
मी वेडापिसा संन्याशी। नागवा फिरतों गांवभर॥२८॥

हें अवघें तुझें तुला । लखलाभ असो बच्चुलाला ।
तुम्हां प्रापंचिकाला । या द्रव्याची जरूर ॥२९॥

माझा यजमान भीमातटीं । उभा विटेसी जगजेठी ।
तो काय माझ्यासाठीं । हे वैभव द्याया तयार नसे ? ॥३०॥

ऐसें म्हणून काढिले । दागिने अंगावरचे भले ।
चहूं बाजूस फेकियले । वस्त्रांचीही तीच गती ॥३१॥

दोन पेढे खाऊन । निघून गेले गजानन ।
हा प्रकार अवलोकून । केला शोक अकोल्यांत बहुतांनी ॥३२॥

त्यांत कांहीं कारंज्याचे । लोक हजर होते साचें ।
ते म्हणती आपुल्या वाचें । अभागी आमुचा लक्ष्मण ॥३३॥

त्याने बच्चुलालापरी । पूजन केलें आपुल्या घरीं ।
परी कचरला अंतरीं । मोह धनाचा धरून ॥३४॥

वरघडीचें भाषण । केले विनय दाखवून ।
ते कां समर्थांकारण । समजणे अशक्य आहे हो ? ॥३५॥

जेवीं पूजा दांभिकांची । शब्दमयीं असते साची ।
पूर्तता महावस्त्राची । होते त्यांची अक्षतेनें ॥३६॥

‘शर्कराखंडखाद्यानि’ । ऐसे म्हणूनिया वदनीं ।
कुचका दाणा आणोनी । ठेवी पुढें भुईमुगाचा ! ॥३७॥

अशा दांभिक पूजनाचें । फलही त्याच स्वरूपाचें ।
वाटोळें लक्ष्मणाचें । याच कृतीनें झाले हो ॥३८॥

हा बच्चुलाल धन्य धन्य । जैसें केलें भाषण ।
तैसेंच ठेविलें वर्तन । जवाहून न आगळें ॥३९॥

आतां याच्या वैभवाला । ओहोट हा ना शब्द उरला ।
संतकृपा झाली ज्याला । तो सुखीच राहातसे ॥४०॥

बच्चुलालांनी तपास । केला अवघ्या अकोल्यास ।
परी न लागला थांग त्यास । समर्थांचा कोठेंही ॥४१॥

असो एक पितांबर नांवाचा । शिष्य शिंपी जातीचा ।
होता गजानन महाराजांचा । शेगांवीं मठामध्यें ॥४२॥

त्यानें सेवा बहुत केली । तपश्चर्या फळा आली ।
एके दिनीं ऐसी झालीं । गोष्ट ऐका मठांत ॥४३॥

फाटकें तुटकें धोतर । नेसला होता पितांबर ।
तें पाहून गुरुवर । ऐशा रीतीं बोललें ॥४४॥

अरे तुझें नांव पितांबर । नेसण्या न धडकें धोतर ।
ढुंगणास पाहाती नारीनर । तें तरी झांक वेडया ! ॥४५॥

नांव म्हणे सोनुबाई । हातीं कथलाचाही वाळा नाहीं ।
नांव पाहतां गंगाबाई । आणि तडफडे तहानेनें ॥४६॥

तशांतलाच प्रकार । आहे तुझा साचार ।
हे फाटके धोतर । पोतेऱ्याच्या उपयोगी ॥४७॥

तेंच नेसून बैससी । ढुंगण जगाला दाविसी ।
हा घे दुपेटा देतो तुसी । नेसावयाकारणें ॥४८॥

तो न करितां अनमान । राहे बाळा नेसून ।
यासी नको सोडू जाण । कोणी कांहीं केले तरी ॥४९॥

पितांबरा दुपेटा नेसला । हे असह्य झालें इतराला ।
भाऊच घातकी भावाला । होतो स्वार्थ दृष्टीनीं ॥५०॥

तो वेडावांकडा प्रकार । कशास बोलूं साचार ।
गटाराचें उघडितां द्वार । घाण मात्र सुटते हो ॥५१॥

श्रीगजानन स्वामीप्रत । शिष्य होते असंख्यांत ।
परी अधिकारी तयांत । दोन्ही हातांच्या बोटांइतके ॥५२॥

पाहा श्रोते कांतारी। वृक्ष असती नानापरी।
त्यांतून क्वचित् कोठें तरी। नजरेस पडती चंदनतरू ॥५३॥

त्यापरीच होते येथें। त्यांच्या शिष्यमंडळींते।
काहीं शिष्य पितांबरातें। टोचूं लागले निरर्थक ॥५४॥

हेंच कां तुझें शिष्यपण। वस्त्र करिसी परिधान।
जें कां समर्थांकारण। ल्यावयाच्या उपयोगी ॥५५॥

तुझी भक्ती कळून आली। तूं खुशालचंद असती मुळीं।
तूं राहूं नको ये स्थळीं। अपमान करण्या सद् गुरूचा ॥५६॥

तैं पितांबर म्हणाला। मी न गुरूचा अपमान केला।
उलट मान ठेविला। आज्ञा ऐकून तयांची ॥५७॥

वस्त्र हे मज त्यांनीं दिलें। नेसावया सांगितले।
तेंच मी हो परिधान केलें। ही का झाली अवज्ञा ? ॥५८॥

ऐसी भवति न भवति झाली। शिष्यांत तेढ माजली।
ती मिटवावया माव केली। ऐशा रीतीं गजाननें ॥५९॥

पितांबरास म्हणती गुरुवर। तूं येथून जावे दूर।
जाणते मूल झाल्यावर। आई त्याला दूर ठेवी ॥६०॥

माझी कृपा आहे खरी । हे पितांबरा तुजवरी ।
जा हिंडून भूमीवरी । पदनतासी तारावें ॥६१॥

डोळयांत आसवें आणून । करूनिया साष्टांग नमन ।
मागे पाहें फिरफिरून । सोडून जातां मठासी ॥६२॥

पितांबर आला कोंडोलीसी । बसला वनांत आंब्यापासी ।
चिंतन चालले मानसी । निजगुरूचें सर्वदा ॥६३॥

तेथें होता रात्रभर । उदया येता दिनकर ।
जाऊन बसला झाडावर । मुंगळ्यांचिया त्रासानें ॥६४॥

अवघ्या आम्रवृक्षावरी । मुंग्या मुंगळे होते भारी ।
लहान थोर फांद्यांवरी । आला पितांबर जाऊन ॥६५॥

परी निर्भय ऐसे सापडेना । स्थान तयासी बसण्या जाणा ।
हेच कृत्य गुराख्यांना । कौतुकास्पद वाटले ॥६६॥

ते म्हणाले आपापसांत । हा माकडापरी कां रे फिरत ? ।
ह्या वृक्षावरी सत्य । हें कांहीं कळेना ॥६७॥

लहान सान फांदीला । निर्भयपणे फिरून आला ।
परीं नाहीं खाली पडला । हेंच आहे आश्चर्य ! ॥६८॥

दुसरा म्हणाला यांत कांहीं । आश्चर्य वाटण्याजोगे नाहीं ।
गजाननाच्या शिष्या ठायीं । ऐसे सामर्थ्य असते रे ॥६९॥

यावरून हा त्यांचा । शिष्य असावा खचित साचा ।
चला हा येथ आल्याचा । वृतांत सांगू गांवात ॥७०॥

गोपमुखें वृत्त कळलें । कोंडोलीचे लोक आले ।
आम्रवृक्षापाशी भले । कोण आलें तें पहावया ॥७१॥

म्हणाले पौरवासी नर । हा ढोंगी असावा साचार ।
बळेंच करितो वेडेचार । गजाननाच्या शिष्यापरी ॥७२॥

शिष्य गजानन महाराजांचा । भास्कर पाटील होता साचा ।
झाला नुकताच अंत त्याचा । अडगांव नामें ग्रामांत ॥७३॥

समर्थांचे शिष्य । येथे येतील कशास ? ।
बळें करण्या उपवास । सोडून बर्फी पेढयाला ॥७४॥

पुसून एकदा यांस पहावें । तो काय म्हणतो ते ऐकावें ।
मग खरें खोटें ठरवावे । उगीच तर्क नाही बरा ॥७५॥

एक मनुष्य पुढे झाला । पितांबरासी पुसूं लागला ।
तूं कोण कोठील कशास आला ? । गुरू तुझा कोण असे ? ॥७६॥

पितांबर बोले त्यावर । मी शेगांवचा रहाणार ।
मी शिंपी पितांबर । शिष्य गजानन स्वामींचा ॥७७॥

त्यांची आज्ञा मजलागून । करण्या झाली पर्यटन ।
म्हणून येथें येऊन । वृक्षापासी बैसलो ॥७८॥

तो आंब्याच्या मुळाशी । मुंगळे होते बहुवसी ।
म्हणून बैसलो फांदीसी । वृक्षावरी जाऊन ॥७९॥

ऐसे ऐकतां तद्भाषण । लोक कोपले दारुण ।
अरे मोठयाचें नांव सांगून । चेष्टा ऐशा करू नको ॥८०॥

काय म्हणे मी राजाची । राणी आवडती आहे साची ।
खळगी भरण्या पोटाची । आले मजुरी करावया ॥८१॥

देशमुख त्या गांवीचा । शामराव नामें साचा ।
तो बोलला ऐसी वाचा । अरे सोंगाडया ऐक हे ॥८२॥

स्वामी समर्थ गजानन । प्रत्यक्ष आहे भगवान ।
त्यांचें नांव सांगून । बट्टा त्यांना लावू नको ॥८३॥

अरे वेडया एक्या काळी । त्यांनीं ऐसी कृति केली ।
ऋतु नसतां आणवली । फळें आम्रवृक्षाला ॥८४॥

त्यांनी फळें आणवली। तूं नुसतीं पानें आण भलीं।
नाहीं तरी या स्थलीं। तुझी न धडगत लागेल ॥८५॥

हा बळीराम पाटलाचा। वृक्ष वठलेला आंब्याचा।
तो पर्णयुक्त करी साचा। आमच्या देखत ये काळीं ॥८६॥

ऐसें न जरीं करशील। तरी मार खाशील।
खरा असल्यास होशील। वंद्य आम्हांकारणे ॥८७॥

कां कीं शिष्य सद् गुरूचे। कांही अंशी निघती साचे।
बापा त्यांच्याच तोडीचें। हा आहे न्याय जगी ॥८८॥

नको करूं उशीर। हा आंबा करी हिरवागार।
ते ऐकता पितांबर। गेला असे घाबरून ॥८९॥

बोलला ऐसे नाडूं नका। माझी सारी कथा ऐका।
एका खाणीत निघती देखा। हिरे आणि गारा हो ॥९०॥

तैसाच मी गार परी। गजानन शिष्याभितरी।
बोललो नाही वैखरी। यत्किंचित खोटे हो ॥९१॥

गारेवरून खाणीस। नाही येत जगी दोष।
मी निज गुरूच्या नांवास। चोरून कैसें ठेवावें ? ॥९२॥

शामराव म्हणें त्यावर । नको करूं चरचर ।
संकट शिष्यास पडता थोर । ते धांवा करिती सद् गुरूंचा ॥९३॥

मग तो शिष्य त्यांचा जरी । नसला कृतीनें अधिकारी ।
तरी सद् गुरूंचा प्रभाव करी । साह्य त्या आपल्या शिष्यांस ॥९४॥

ऐसी झाली आडविहीर । पितांबरासी साचार ।
झाला बिचारा चिंतातुर । कांहीं न सुचे तयासी ॥९५॥

त्या वठलेल्या झाडापासी । मिळाले अवघे पौरवासी ।
काय होतें ते पहावयासी । मुलें बायका समवेत ॥९६॥

निरुपाय होऊनि अखेर । पितांबरानें जोडिले कर ।
स्तवन मांडिले अपार । आपुल्या सद् गुरूरायांचे ॥९७॥

हे स्वामी समर्थ गजानना ! । ज्ञानांबरीच्या नारायणा ।
पदनताच्या रक्षणा । धांव आतां ये काळी ॥९८॥

माझ्यामुळें दोष तुला । येऊं पाहतो भक्तपाला ।
आपुल्या ब्रीदासाठी पाला । आणीव आम्रवृक्षासी ॥९९॥

माझी भिस्त तुझ्यावरी । पाव मातें लवकरीं ।
ना तरी आली पाळी खरी । मजला येथें मरण्याची ॥१००॥

प्रल्हाद खरा करण्याला। स्तंभीं नरहरी प्रगटला।
जनी चढवितां सुळाला। त्याचें पाणी जहालें ॥१॥

जनीचा भार देवावर। माझा आहे तुजवर।
संतदेवांत अंतर। मुळींच नाही राहिलें ॥२॥

देव तेची असती संत। संत तेची देव साक्षात्।
मला लोक म्हणतात। शिष्य गजाननाचा ॥३॥

माझे कांहीं महत्त्व नाहीं। ते अवघे तुझ्याठायीं।
पुष्पामुळें किंमत येई। जगी सूत्राकारणें ॥४॥

तूं पुष्प मी आहे सूत। तूं कस्तुरी मी माती सत्य।
तुझ्यामुळेंच आलें येथ। संकट हें माझ्यावरी ॥५॥

आतां न माझा अंत पाही। गुरुराया ! धांव घेई।
या वठलेल्या वृक्षाठायीं। आणी पर्णे कोमल ॥६॥

लोकांस म्हणें पीतांबर। करा सद् गुरूंचा नामगजर।
जय जय गजानन साधुवर। शेगांवच्या अवलिया ॥७॥

लोक अवघे गजर करिती। तों पालवी फुटली वृक्षाप्रती।
जन नयनी पाहती। त्या अगाध कौतुकाला ॥८॥

कोणी म्हणती असेल स्वप्न । तें जे पडले आपणांलागून ।
पाहा चिमटा घेऊन । आपुल्याला करांनी ॥९॥

चिमटे घेऊन पाहती । तो निमाली स्वप्नभ्रांति ।
यावरी कोणी ऐसे म्हणती । हि नजरबंदी असेल ! ॥११०॥

गारुडयांच्या खेळांत । वाद्या होती सर्प सत्य ।
खापऱ्या असून दृष्टीप्रत । त्यांचें रुपये दिसती कीं ॥११॥

तोही भ्रम निमाला । तोडून पाहता पर्णाला ।
फांदीवाते तात्काळ आला । चीक शुभ्रसा बाहेर ॥१२॥

मग मात्र खात्री झाली । वाळल्या वृक्षा पालवी फुटली ।
श्रीगजानन माऊली । खरीच आहे महासंत ॥१३॥

आतां पितांबराविशीं । शंका न धरणें मानसीं ।
चला घेऊन गांवासी । हा त्यांचा शिष्य असे ॥१४॥

याच्यायोगें करून । कधीतरी गजानन ।
येतील कोंडोलीकारण । वांसरासाठीं गाय जैसी ॥१५॥

तें अवघ्यासी मानवलें । पितांबरासी मिरवीत नेलें ।
ऐसे जेंव्हा दिव्य झालें । तेंव्हा भाव उदेला ॥१६॥

जैसा समर्थांनी आपुला । शिष्य डोमगांवी पाठविला ।
कल्याण नामें करून भला । कल्याण करण्या जगाचें ॥१७॥

तैसेच केले गुरुवरें । श्रीगजानने साजिरे ।
उदेले हे भाग्य खरें । त्या कोंडोली गांवचे ॥१८॥

श्रोते अजूनपर्यंत । तो आंबा आहे कोंडोलीत ।
इतरांपेक्षा असंख्यात । फळे येती तयाला ॥१९॥

त्या पितांबराचे भजनी । कोंडोली गांव लागला जाणी ।
जेथे जाईल हिरकणी । तेथे ती मोल पावे ॥१२०॥

मठ पितांबराचा । कोंडोलीत झाला साचा ।
आणि अंतही तयाचा । ते ठायीं झाला हो ॥२१॥

आतां इकडे शेगांवांत । महाराज आपुल्या मठांत ।
एके दिवशी उद्विग्न चित्त । होऊनिया बैसले ॥२२॥

शिष्य त्यांचें कारण । पुसूं लागले कर जोडून ।
महाराज आपुले मन । कां हो अस्थिर जाहलें ? ॥२३॥

तैं महाराज वदले लोकांला । आमचा कृष्णा पाटील गेला ।
जो चिकणसुपारी आम्हांला । रोज आणून देत असे ॥२४॥

त्याची झाली आठवण । राम त्याचा मुलगा लहान ।
आतां सुपारी चिकण । कोण देतो या ठायां ॥२५॥

राम थोर झाल्यावरी । करील माझी चाकरी ।
म्हणून मी या मठांतरी । आतां ना तयार राहावया ॥२६॥

ऐसे महाराज बोलतां । जनालागी लागली चिंता ।
महाराजांचा विचार आतां । दिसतो येथून जाण्याचा ॥२७॥

म्हणून कसेंही करून । जाऊं न द्यावें त्याकारण ।
चला आपण धरू चरण । महाराजांचे येवेळां ॥२८॥

ऐसा विचार मिळून केला । मंडळी आली मठाला ।
श्रीपतराव बंकटलाला । ताराचंद मारुती ॥२९॥

मंडळींनीं धरिलें चरण । महाराज आम्हां सोडून ।
तुम्ही आपुले ठिकाण । राहण्याचें अन्य करू नये ॥१३०॥

तुमची इच्छा असेल जेथ । तेथेच राहा शेगांवांत ।
परी सोडण्याचें मनांत । ग्राम हें आणूं नका ॥३१॥

तैं महाराजवाणी निघाली । तुमच्या गांवांत आहे दुफळी ।
मला कोणाची जागा मुळीं । नको येथें राहावया ॥३२॥

जी कोणाची नसेल । ऐसी जागा जरी द्याल ।
तरीच राहणें होईल । माझें या शेगांवी ॥३३॥

ऐसी गोष्ट ऐकिली । तेव्हां मंडळीं चिंतावली ।
समर्थांनीं आज्ञा केली । मोठया पेंचाची आपणां ॥३४॥

कोणाच्या जागेंत । राहण्या तयार नाहींत ।
सरकार यांच्या प्रीत्यर्थ । जागा ती देईल कशी ? ॥३५॥

भूषण आपल्या साधूचें । सरकारास नाहीं साचें ।
बंकटलाल बोलला वाचें । ऐसे संकट घालूं नका ॥३६॥

सरकार धार्मिक कृत्याला । जागा देईल हा न उरला ।
भरंवसा तो आम्हांला । हें राज्य परक्याचें ॥३७॥

म्हणून आम्हांपैकी कोणाची । जागा घ्या मागून साची ।
आहे तयारी आमुची । ती तुम्हां द्यावयास ॥३८॥

समर्थें केलें भाषण । काय हे तुमचें अज्ञान ।
जमिनीची मालकी पूर्ण । आहे सच्चिदानंदाची ॥३९॥

राजे कित्येक भूमीवरी । आजवरी झाले तरी ।
जागा कशाची सरकारी । इचा मालक पांडुरंग ॥१४०॥

व्यवहारदृष्ट्या मालकपण । येते राजालागून ।
त्याचें नाहीं भूषण । तुम्ही प्रयत्न करा जा ॥४१॥

जागा मिळेल प्रयत्न करितां । पुढें नका बोलूं आतां ।
हरी पाटलाच्या हातां । यश येईल निःसंशय ॥४२॥

हरी पाटलाकडे आली । मंडळी ती अवघी भली ।
त्याच्या सल्ल्यानें मागितली । जागा अर्ज करून ॥४३॥

बुलढाण्याचा सर्वाधिकारी । साहेब होता नामे 'करी' ।
त्यानें एक एकर जागा खरी । अर्जावरून दिली असे ॥४४॥

आणि ऐसें म्हणाला । तुम्ही दोन एकरास्तव अर्ज केला ।
परी मी तुर्त तुम्हांला । एक एकर देतसे ॥४५॥

तुम्ही एक वर्षात । जागा केल्या व्यवस्थित ।
तुमचा मी पुरवीन हेत । जागा आणिक देऊनिया ॥४६॥

तो ठराव सरकारचा । आहे दप्तरीं नमूद साचा ।
समर्थांच्या वाणीचा । प्रभाव खचित लोकोत्तर ॥४७॥

मग हरी पाटील, बंकटलाल । निघते झाले वर्गणीला ।
द्रव्यनिधी क्षणांत जमला । आणि काम झाले सुरूं ॥४८॥

यापुढील अवघे वृत्त । येईल पुढल्या अध्यायांत ।
सत्पुरुषाचा पुरविण्यात हेत । देव राहे तत्पर सदा ॥४९॥

विठू पाटील डोंगरगांवचा । लक्ष्मण पाटील वाडेगांवचा ।
जगु आबा शेगांवचा । हे पुढारी वर्गणीचे ॥१५०॥

श्रीदासगणूविरचित । हा गजाननविजय नामें ग्रंथ ।
ऐका श्रोते सावचित्त । निजकल्याण व्हावया ॥१५१॥

शुभं भवतु ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥
॥ इति श्री गजानन विजय ग्रंथस्य द्वादशोध्यायः ॥

@@@@@

